


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : २८८, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.३० मे २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## जून महिन्यात 'एल निनो' सक्रिय होणार, सरासरीच्या ९० टक्के पाऊस

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२९, मुंबई :** देशावर 'एल निनो' ची सावट असल्यामुळे नागरिकांची चिंता वाढली आहे. हवाम ान विभागाने जून महिन्यासाठी आणि संपूर्ण मोसमासाठी नवा अंदाज जाहीर केला आहे. २०२६च्या मान्सूनसाठी हवामान विभागाने दीर्घकालीन अंदाज (Long Range Forecast) जाहीर केला असून यानुसार यंदा सरासरीच्या ९० टक्केच पाऊस होण्याची शक्यता आहे. यापूर्वी एप्रिल महिन्यात हा आकडा ९२ टक्के असेल असा अंदाज होता. पण आता हा आणखी खाली घसरल्यामुळे शेतकऱ्यांसमोर मोठं संकट निर्माण झालं आहे.




**काय परिणाम होणार?**

आयएमडीने शुक्रवारी जारी केलेल्या पत्रात जून महिन्यातचं 'एल निनो' सक्रिय होईल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. हळूहळू एल निनोचा प्रभाव वाढत जाण्याची शक्यता आहे. जून ते सप्टेंबरदरम्यान नैऋत्य मोसमी पाऊस सरासरीहून ९० टक्के होणार असल्याचा अंदाज आहे. यामध्ये चार टक्के कमी-जास्त परिणाम दिसू शकतो. यामुळे जून महिन्यात नेहमीपेक्षा अधिक प्रमाणात उष्णतेच्या तीव्र लाटा राहण्याची शक्यताही व्यक्त करण्यात आली आहे.

जून महिन्यात ईशान्य भारतातील पावसावर अधिक परिणाम दिसणार नसून सामान्य पाऊस होईल. पण मध्य आणि द्विपकल्पीय भारतात सरासरीपेक्षा कमी पाऊस होणार आहे. यामुळे महाराष्ट्रावर मोठा परिणाम होणार आहे. मध्य भारतावर याचा ४३ टक्के परिणाम होणार असून द्विपकल्पात ४५ टक्के परिणाम दिसून येणार आहे. जून २०२६मध्ये उत्तर प्रदेश, हरियाणा, पंजाब, बिहार, झारखंड, ओडिशा, छत्तीसगड, गुजरात, आंध्र प्रदेश, महाराष्ट्र, तेलंगण, हिमाचल प्रदेश आणि तामिळनाडूमध्ये उष्णतेच्या तीव्र लाटा असतील.

सध्या प्रशांत महासागरात एल निनोची परिस्थिती निर्माण होत आहे. ही प्रणाली भारतात नैऋत्य मोसमी पावसाच्या काळात पोहचण्याचा अंदाज आहे. याचा खरिपावर मोठा परिणाम होणार आहे.

**खरिप पिकाला फटका बसणार**

पश्चिम आशियातील संघर्षामुळे अन्नधान्याच्या किंमती वाढलेल्या आहेत. भारताला महागाईच्या झळा बसत आहेत. कमी पावसाम ुळे शेतीच्या उत्पादनावर मोठा परिणाम होणार असून शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. येत्या काही आठवड्यात एल निनोची परिस्थिती उद्भवणार असून देशात उष्णताही वाढण्याची शक्यता आहे. यामुळे कृषी उत्पादनावर दबाव येऊ शकतो. वर्षाच्या उत्तरार्धात धान्या महागण्याची भीती आहे.

यावेळी ईशान्य भारतात सरासरीच्या ९४ ते १०६ टक्के पाऊस होणार आहे. पण देशातील शेतीवर अवलंबून असलेला भाग, म्हणजे मान्सून कोअर झोनमध्ये सरीसरीच्या तुलनेत कमी पावसाची नोंद केली जाणार आहे. याशिवाय हिंद म हासागरातील द्विध्रुव ( खपवळरप जलशरप ्ळोंश्रिश ) सध्या तटस्थ आहे. संपूर्ण मान्सून हंगामात हे तटस्थच राहणार असल्यामुळे फरासा परिणाम होणार नाही. हवामान विभाग जुलैमधील पावसाचा अंदाज जुन महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात प्रसिद्ध करणार आहे.

## अहिल्यानगरमध्ये स्पा सेंटरच्या नावाखाली देहविक्रीचे रॅकेट उघड!

### पोलिसांचा छापा, चार महिलांची सुटका...




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२९, अहिल्यानगर :** शहरातील अहिल्यानगर-मनम ाड रस्त्यालगत असलेल्या साई मिडास इमारतीमध्ये अँक्यूम स्पा सेंटरवर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने बुधवारी (३७ मे) रात्री धाड टाकून सुरू असलेला कथित देहविक्रीचा व्यवसाय उघडकीस आणला. या कारवाईत चार महिलांची सुटका करण्यात आली असून मालक, मॅनेजर, ग्राहक यांच्यासह चौघांविरूध्द तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कारवाईदरम्यान रोख रक्कम, मोबाईल फोन आदी ६० हजार १०० रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य यांना माहिती मिळाली होती की, अहिल्यानगर-मनमाड रस्त्यावरील साई मिडास इमारतीच्या दुसर्या मजल्यावर सुरू असलेल्या अँक्यूम मसाज पार्लर व स्पा सेंटरमध्ये महिलांना पैशांचे आमिष दाखवून पुरूष ग्राहकांबरोबर अनैतिक संबंध ठेवण्यास भाग पाडले जात आहे. या माहितीच्या आधारे पोलीस पथकाने पंचांसह सापळा रचला. बनावट ग्राहकाला स्पा सेंटरमध्ये पाठविण्यात आले. त्यानंतर खात्री झाल्यावर रात्री १२.३५ वाजता पोलिसांनी स्पा सेंटरवर छापा टाकला.

कारवाईदरम्यान स्पा सेंटरमध्ये मॅनेजर अनिकेत अशोक बचाटे (वय २७, रा. कुंभारगाव, ता. करमाळा, जि. सोलापूर) व कामगार काळुराम भिमा समिंदर (वय २८, रा. मांडवगण फराटा, ता. शिरूर, जि.पुणे), ग्राहक सजन एस. (वय ४५,रा,केरळ) हे आढळून आले. तपासादरम्यान स्पा सेंटरचा मालक संतोष गणेश बघे ( रा छत्रपती संभाजीनगर) असल्याची माहिती समोर आली. स्पा सेंटरमधील विविध रूमची तपासणी केली असता एका खोलीत बनावट ग्राहकासोबत महिला आढळून आली.

चौकशीत संबंधित महिलांनी स्पा सेंटरच्या नावाखाली देहविक्री करण्यास भाग पाडले जात असल्याची माहिती पोलिसांना दिली. चार महिलांची सुटका करण्यात आली असून चालक, मॅनेजर, कामगार व ग्राहक अशा चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई निरिक्षक वैद्य, निरीक्षक जगदीश भांबळ, उपनिरीक्षक तुषार धाकराव, अंमलदार नितीन उगलमुगले, सुधीर खाडे,छाया रांधवण, अर्चना काळे आदींच्या पथकाने केली.

## बल्लारपुरात कॉंग्रेसचा पेट्रोल, डिझेल व गॅस दरवाढी विरोधात आक्रोश

### नगरपालिका चौकात धरणे आंदोलन : तहसीलदारांना दिले मागण्याचे निवेदन

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२९, बल्लारपूर (चंद्रपूर) :** केंद्र सरकार ने नियोजन शून्य कारभाराचा परिचय पेट्रोल, डिझेल व गॅस सिलेंडर ची दरवाढ केली. यामुळे सर्वसामान्य जनतेला मोठा फटका बसला आहे. यामुळे जनता त्रस्त झाली आहे. केंद्र व राज्य सरकार जनतेला महागाईच्या खाईत ढकलत असून इंधन दर वाढ मागे घ्या, म्हणून कॉंग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी नगरपालिका चौकात धरणे आंदोलन करून आक्रोश व्यक्त केला. यासंदर्भात बल्लारपूर येथील तहसीलदार रेणुका कोकाटे यांना मागण्याचे निवेदन सादर करण्यात आले.

ज्यावेळी देशात डॉ.मनम ोहनसिंग पंतप्रधान होते. त्यावेळी त्यांनी देशाची अर्थव्यवस्था योग्य पद्धतीने हाताळली होती. पेट्रोल, डिझेल व गॅस सिलेंडर चे दर आटोक्यात होते. आजघडीला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या बारा वर्षाच्या कार्यकाळात इंधन दरवाढीचा दर दुप्पट झाला आहे. परिणामी सर्वसामान्य जनतेला महागाईचा चटका सोसावा लागत आहे. त्यांच्या नियोजन शून्य कारभाराचा हा परिणाम आहे, असा आरोप कांग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी केला.

बल्लारपूर येथील पेट्रोल, डिझेल व गॅस दर वाढीचे आंदोलन शहर कांग्रेसचे अध्यक्ष अब्दुल करीम यांच्या नेतृत्वात करण्यात आले. यावेळी नगराध्यक्ष डॉ. अलका अनिल वाढई, अॅड. मेघा भाले, अफसाना सय्यद, गोविंदा उपरे, माजी नगराध्यक्ष दिलीप माकोडे, मेहमुद पठाण, रवि मांतगी, नगरसेवक भास्कर माकोडे, माजी नगरसेवक नासिर खान, अनिल खरतड, हेमंत मानकर यांच्या सह कॉंग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी तहसीलदार रेणुका कोकाटे यांना निवेदन सादर करून इंधन दरवाढीचा प्रश्न निकालात काढण्याची मागणी केली.




## बामणी टी पॉईंटवर अवैध रेती वाहतुकीवर एलसीबीची धडक कारवाई

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२९, बल्लारपूर(चंद्रपूर) :** बल्लारपूर परिसरात अवैध रेती वाहतुकीविरोधात स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूर यांनी गुरुवारी पहाटे मोठी कारवाई करत तब्बल ४५ लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. बामणी टी-पॉइंट येथे ही कारवाई करण्यात आली. पोंभूर्णा परिसरातून अवैधरित्या रेती भरून हायवा ट्रक बल्लारपूर मार्गे येत असल्याची गोपनीय माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी पहाटे सुमारे ५ वाजताच्या सुमारास सापळा रचून संशयित हायवा अडविला. तपासणी दरम्यान ट्रकमध्ये ९ ब्रास रेतीची बेकायदेशीर वाहतूक सुरू असल्याचे आढळून आले. कारवाई दरम्यान पोलिसांनी टाटा सिग्ना कंपनीचा एमएच ३४ सीक्यू ११९० क्रमांकाचा हायवा ट्रक जप्त केला.

या वाहनाची किंमत अंदाजे ४५ लाख रुपये असून त्यामधील ९० हजार रुपये किमतीची ९ ब्रास रेतीही जप्त करण्यात आली. एकूण ४५ लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे. या प्रकरणी चालक गणेश शिवाजी कोरपल्लेवार (वय २५) रा. नारपठार, ता. जिवती यास अटक करून याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच वाहन मालक गोपीनाथ राठोड रा. सारंगापूर, ता. जिवती हा फरार असून पोलिस त्याचा शोध घेत आहेत. सदर कारवाईनंतर पोस्टे बल्लारपूर येथे भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), ४९ तसेच जमीन महसूल कायदा व मोटार वाहन कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

सदर कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांचा नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक सर्वेश बेलसरे, पोहवा संतोष येलपुलवार, गणेश भोयर यांनी केले.

## ६०० कोटींच्या अत्याधुनिक मशनरी धुळखात

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२९, चंद्रपूर :** ६०० कोटी रुपयांपेक्षा अध्क खर्च करुन चंद्रपूर येथे दिमाखात उभे राहिलेले मा. सा. कन्नमवार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय पाण्याचा प्रश्न सुटेपर्यंत बंद ठेवणे अत्यंत अयोग्य आहे. या दिरंहगाईमुळे येथे आलेल्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाने विकसित मशनरी आणि कोट्यावधी रुपयांच्या इमारती बंद अवस्थेत खराब होण्याचा मोठा धोका निर्माण झाला आहे. पाणी प्रशन पूर्णपणे सुटायला अजून एक ते दीड वर्ष लागू शकते; परंती तोपर्यंत हातावर हात धरुन वाट न पाहता तातडीने १० ट्युबवेल खोदून हे महाविद्यालय टप्प्याटप्प्याने सुरु करावे, अशा लोकहितकारी सूचना खासदार प्रतिभा धानोरकर यांनी कॅालेज परिसराचा सविस्तर पाहणी दौरा करुन प्रशासनाला दिल्या.




हे महाविद्यालय पूर्ण क्षमतेने सुरु झाल्यास चंद्रपूर शहरातील जुन्या शासकीय महाविद्यालयावरील रुग्णांचा प्रचंड ताण कमी होईल, चंद्रूरच्या वैद्यकीय व्यवस्थेत मोठी भर पडेल, तसेच विद्यार्थ्यांना दर्जेदार वैद्यकीय शिक्षण घेणे सोयीचे होईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

या पाहणी दौऱ्यादरम्यान खा. प्रतिभा धानोरकर यांनी परिसरातील इतरही अनेक गंभीर समस्यांवर अधिष्ठाता डॉ. मिलिंद कांबळे व संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले. नवीन मेडिकल कॅालेजच्या परिसरात काही टवाळखोर युवक नशा करून महिलांची छेड काढत असल्याचे निदर्शनास आले आहे. भविष्यात या परिसरात गुन्हेगारीचे हे प्रमाण वाढण्याची शक्यता असल्याने येथे तातडीने पोलिस चौकी स्थापन करुन पोलिसांचे पेट्रोलिंग वाढविण्यात यावे, जेणेकरुन महिला व विद्यार्थिनींना सुरक्षित वातावरण मिळेल, अशा सूचना त्यांनी दिल्या. तसेच हे महाविद्यालय व कॅन्सर हॅास्पिटल शहरापासून काहीसे दूर असल्याने येथे येण्यासाठी सामान्य रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. हा तेरास कायमचा दूर करण्यासाठी या परिसरात त्वरित अधिकृत बस थांबा देण्यात यावा आणि सकाळी २ वेळा, दुपारी १ वेळ व सायंकाळी २ वेळा बस फेऱ्या सुरु करण्यात याव्यात, जेणेकरुन गोरगरीब रुग्णांची वाहतुकीची मोठी सोय होईल, अशी सूचना त्यांनी केली.

या पाहणी दौऱ्याप्रसंगी कर्मवीर मा. सा. कन्नमवार शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. मिलिंद कांबळे, कॅांग्रेस शहर जिल्हाध्यक्ष शिवा राव, महिला व बाल कल्याण सभापती संगीता भोयर, झोन-३ सभापती रामनरेश यादव, ए. आय. पी. सी. जिल्हाध्यक्ष रामकृष्ण कोंड्रा, संगिता अमृतकर, सुरेंद्र अडबाले, राहुल घोटेकर, राहुल चौधरी, अजय बल्की, सुनंदा धोबे, वैशाली म हाडोळे, माजी नगरसेवक गोपाल अमृतकर, यांच्यासह कॅांग्रेसचे वरिष्ठ पदाधिकारी, कार्यकर्ते आणि रुग्णालयातील सर्व वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भिवंडी बस आगाराच्या नूतनीकरणासाठी १४.१८ कोटींचा निधी मंजूर



**अक्षराज : रविंद्र खाडे**

**दि.२९, भिवंडी (ठाणे) :** शहरातील बस आगाराच्या जीर्ण अवस्थेमुळे प्रवाशांना होत असलेल्या गैरसोयी लक्षात घेऊन राज्य शासनाने अखेर नूतनीकरणासाठी १४ कोटी १८ लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या निर्णयामुळे भिवंडीकरांसाठी मोठा दिलासा मिळाला आहे.

बस आगाराच्या दुरवस्थेबाबत नागरिकांकडून सातत्याने तक्रारी येत होत्या. या पार्श्वभूमीवर खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांनी पुढाकार घेत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची भेट घेतली आणि नूतनीकरणासाठी लेखी मागणी केली होती. तसेच त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडेही यासंदर्भात पाठपुरावा केला होता.

राज्य शासनाच्या गृह विभागाने २५ मे रोजी या प्रस्तावाला मंजुरी देत निधी जाहीर केला. या नूतनीकरणामुळे बस आगाराची इमारत अधिक सुरक्षित व आधुनिक होणार असून प्रवाशांना आवश्यक सुविधा उपलब्ध होणार आहेत. या निर्णयामुळे भिवंडीतील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला चालना मिळणार असून प्रवाशांचा प्रवास अधिक सोयीस्कर होणार आहे.




# 'गोकुळ' ला हलाल सर्टिफिकेशन भोवणार का ?

'कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित, कोल्हापूर' अर्थात 'गोकुळ' दुग्ध उत्पादन कंपनीने तूप, लोणी आणि दूध पावडर यांसाठी हलाल प्रमाणपत्र घेतल्याचे वृत्त नुकतेच वाचनात आले. वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांचे पुत्र नविद मुश्रीफ हे या कंपनीचे अध्यक्ष आहेत. गोकुळचे तूप आणि दूध पावडर आखाती देशांमध्ये निर्यात केले जातात आणि आंतरराष्ट्रीय निर्यातीसाठी अशा प्रमाणपत्रांची आवश्यकता असल्याचा खुलासा खुद्द हसन मुश्रीफ यांनी केला आहे.

गोकुळने २०२२ सालीच हलाल प्रमाणपत्र घेतल्याचेही मश्रीफ यांनी स्पष्ट केले आहे. घट्ट आणि अधिक साय निर्माण करणारे दूध म्हणून ख्याती असणारे गोकुळ दूध राज्यातील अनेक ग्राहकांचे पसंतीचे दूध आहे त्यामुळे इतर कंपनीच्या दुधापेक्षा महाग असले तरी अनेक जण ते प्रतिदिन आवडीने खरेदी करतात.

गोकुळ दुधाने आजतागायत आपला दर्जा टिकवून ठेवल्याने अनेक वर्षांपासून केवळ गोकुळ दूध खरेदी करणारी हजारो कुटुंब आज राज्यात आहेत. राज्यात आणि राज्याबाहेरही गोकुळचे दूध आणि दुग्धजन्य उत्पादने मोठ्या प्रमाणात विकली जातात. गोकुळचे ग्राहक हे बहुसंख्य हिंदूच आहेत त्यामुळे गोकुळने हलाल प्रमाणपत्र घेतल्याचे लक्षात आल्यावर अनेकांना धक्का बसला आहे. याचा परिणाम म्हणून येणाऱ्या काळात गोकुळची ग्राहकसंख्या रोडवण्याची शक्यता नाकारता येत नाही. आंतरराष्ट्रीय निर्यातीसाठी हलाल प्रमाणपत्र आवश्यक असल्याचे हसन मुश्रीफ यांनी सांगितले असले, तरी गोकुळपेक्षा कितीतरी पटीने वार्षिक उलाढाल असलेल्या अनेक भारतीय कंपन्या हलाल प्रमाणपत्र न घेता आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्तम व्यवसाय करत आहेत, त्यामुळे मुश्रीफ यांचे म्हणणे मनाला न पटणारे आहे. व्यवसायवृद्धीसाठी हलाल प्रमाणपत्र घेण्यात मुश्रीफांना काही गैर वाटत नसले तरी हलाल प्रमाणपत्र घेणे म्हणजे आतंकवादाला प्रोत्साहन देणेहे समीकरण आता सर्वश्रुत झाले आहे.

जागतिक पातळीवर अनधिकृतपणे समांतर अर्थव्यवस्था उभारणाऱ्या हलाल प्रमाणपत्राने भारततही आपले हातपाय घट्ट रोवले आहेत. या प्रमाणपत्राचे धोके ओळखून उत्तर प्रदेशमध्ये योगी सरकारने




हलाल प्रमाणपत्रावर बंदी घातली आहे. अशाच प्रकारे महाराष्ट्रातही हलाल प्रमाण पत्राच्या नोंदीवर आणि हलाल प्रमाणित उत्पादनांवर बंदी आणावी यासाठी हिंदुत्ववादी आणि राष्ट्रप्रेमी संघटना मागील काही काळापासून सरकारचा पाठपुरावा करत आहेत, सरकार दरबारी निवेदने देत आहेत, सनदशीर मार्गाने आंदोलने करत आहेत. जागतिक पातळीवर काही मुस्लिम संघटना अनधिकृतपणे हलाल सर्टिफिकेशनची योजना राबवत आहेत.

त्यांच्या शाखा आज भारतभर निर्माण झाल्या आहेत. या संघटना व्यापारी कंपन्यांकडून लक्षावधी रुपये घेऊन त्यांना हलाल प्रमाणपत्र देतात. या प्रमाणपत्रासोबत उत्पादनावर छापण्यासाठी लोगो देण्यात येतो. मुस्लिमबहुल भागात तेथील नागरिक हा लोगो पाहूनच उत्पादने खरेदी करतात, असे यांच्याकडून सांगण्यात येते. एकदा हलाल प्रमाणपत्र घेतल्यावर दरवर्षी ने नूतनीकरण करण्यासाठी पुन्हा हजारो रुपये या संघटना व्यापाऱ्यांकडून वसूल करतात. या सर्व प्रक्रियेत त्या देशातील सरकारला कोणताही लाभ होत नाही. सरकार दरबारी या सर्व व्यापाराची कोणतीही अधिकृत नोंद नसते. या योजनेतून गोळा करण्यात आलेल्या पैशातून आज हलाल इकॉनॉमी जागतिक पातळीवरील एक बलाढ्य इकॉनॉमी झाली आहे. या योजनेतून मिळणारा पैसा जगभरात पकडल्या गेलेल्या आतंकवाद्यांना न्यायालयीन साहाय्य पुरवण्यासाठी वापरला जातो हे आता सप्रमाण सिद्ध झाले आहे. यासंदर्भातील अनेक व्हिडीओज आणि लेख गूगलवर उपलब्ध आहेत.

भविष्यातील धोका ओळखून उत्तर प्रदेश सरकारने राज्यात विखुरलेल्या या संघटनांची पाळेमुळे खणून काढायला सुरुवात केली आणि राज्यात हलाल सर्टिफिकेशन करण्यावर बंदी घातली आहे. जागतिक अर्थव्यवस्थेला आव्हान देणाऱ्या हलाल इकोनॉमीच्या अनधिकृत सर्टिफिकेशनवर आता अनेक राष्ट्र बंदी घालण्याच्या तयारीत असून काही राष्ट्रांनी याबाबत कडक धोरण आखले आहे. खाद्यपदार्थांच्या संदर्भात कायद्यानुसार 'भारतीय खाद्य सुरक्षा आणि मानक प्राधिकरण' (एफएसएसएआय) या शासकीय संस्थेला खाद्यपदार्थांचे मानके ठरवण्याचा व प्रमाणपत्र देण्याचा अधिकार देण्यात आला आहे; मात्र 'हलाल प्रमाणन' ही एक समांतर प्रणाली उभी करण्यात आली आहे, जी खाद्य पदार्थांच्या गुणवत्तेबाबत भ्रम निर्माण करून सरकारी नियमांचे उल्लंघन करते. महाराष्ट्रासह देशभरात 'हलाल इंडिया', 'हलाल सर्टिफिकेशन सर्व्हिसेस इंडिया', 'जमियत उलेमा-ए-हिंद', 'जमियत उलेमा-ए-महाराष्ट्र' आदी अनेक संस्थांकडून बेकायदेशीरपणे हलाल प्रमाणपत्रांचे वाटप करून अब्जावधी रुपये गोळा करण्यात येत आहेत. स्वत: केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनीही खाजगी संस्थांना अवैधरित्या प्रमाणपत्र वाटप करून पैसे गोळा करण्याचा अधिकार नाही, असे यापूर्वीच स्पष्ट केले आहे. हलाल इकोनॉमीला सहकार्य म्हणजे आतंकवादाला समर्थन हे समीकरण लक्षात घेऊन हलाल प्रमाणपत्र घेणाऱ्या कंपन्यांवर, उपहारगृहांवर आणि वस्तूंवर नागरिकांनी बहिष्कार घालावा, वस्तू विकत घेताना त्यावर हलाल चिन्ह आहे का पडताळावे, हॉटेल, रेस्टरंटमध्ये जाताना बोर्डावर, मेन्यूकार्डावर हलालचे चिन्ह आहे का तपासावे. असे चिन्ह असलेले पदार्थ खरेदी करणे टाळावे अशा प्रकारचे आवाहन देशप्रेमी संघटना आणि संस्था सर्वत्र करत असताना आता घराघरात पोहोचलेल्या गोकुळ कंपनीनेच हलाल प्रमाणपत्र घेतल्याचे वृत्त वाचनात आल्याने गोकुळाविषयी जनमानसांत रोष निर्माण झाला आहे. हा रोष गोकुळच्या एकूणच व्यवसायावर परिणाम करतो की गोकुळला हलाल सर्टिफिकेशन रद्द करायला लावतो हे येणाऱ्या काळात पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क करा. ९६६४५५९७८०**

## महाराष्ट्रासाठी नामुष्की

राष्ट्रीय परीक्षा एजन्सीकडून घेण्यात येणाऱ्या नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणी सीबीआयने आणखी एका क्लास चालक व त्याचा मुलाला अटक केल्याची बातमी वर्तमानपत्रात वाचली. नीट पेपर फुटीचा तपास करणाऱ्या सीबीआयकडून आतापर्यंत १३ जणांना अटक केली असून त्यात अनेक मोठे मासे त्यांच्या गळाला लागले आहेत. सीबीआय या प्रकरणाचा तपास करत असल्याने आणखी मोठे मासे सीबीआयच्या गळाला लागण्याची शक्यता आहे तसेच अनेक धक्कादायक खुलासेही समोर येण्याची शक्यता आहे. सीबीआयने नीट पेपरफुटी प्रकरणी आतापर्यंत जे १३ आरोपी अटक केले आहेत त्यातील १० आरोपी हे महाराष्ट्रातील असल्याने या पेपर फुटीचे कनेक्शन महाराष्ट्राशी असल्याचे दिसून येत आहे. अर्थात ही महाराष्ट्रासाठी भूषणावह नाही तर लाजिरवाणी बाब आहे. लातूरमधील रसायन शास्त्राचा निवृत्त प्राध्यापक पी व्ही कुलकर्णी हा या पेपरफुटी मागचा मास्टर माईंड असल्याचे पुढे आले आहे. त्याच्या बरोबरच मनीषा मांढरे या जीवशास्त्राच्या प्राध्यपिकेलाही पेपरफुटी प्रकरणी सीबीआयने अटक केली आहे. महाराष्ट्रातील पुणे, नांदेड, लातूर, नागपूर नाशिक, अहिल्यानगर या जिल्ह्यांचे या घोटाळ्याशी थेट कनेक्शन आढळून आले आहे. विशेष म्हणजे विद्येचे माहेरघर समजल्या जाणाऱ्या पुणे शहरातून आतापर्यंत पाच आरोपींना अटक करण्यात आली आहे. मनीषा गुरुनाथ मांढरे, मनीषा संजय हवालदार, पी व्ही कुलकर्णी, तेजस शाह व डॉ मनोज शिरुरे असे पुण्यातून अटक झालेल्या आरोपींची नावे आहेत तर लातूरमधून शिवराज मोटेगावकर, अहिल्यानगर मधून धनंजय लोखंडे, नाशिकमधून शुभम खैरनार असे महाराष्ट्रातून अटक झालेल्या आरोपींची नावे आहेत. विशेष म्हणजे अटक झालेले सर्व आरोपी उच्चशिक्षित डॉक्टर, प्राध्यापक क्लास चालक आहेत. लाखो रुपये पगार घेऊन प्राध्यापकी करणारे आणि ज्यांना देवमाणूस म्हणून समाजात मान दिला जातो अशा डॉक्टरांकडून अशा घटना घडणे धक्कादायक आहे. महाराष्ट्राच्या शैक्षणिक परंपरेला काळीमा फासणाऱ्याच या घटना आहेत. कोट्यवधी रुपये मिळवण्याच्या लालसेने हे उच्चशिक्षित लोक गुणवंत विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळत आहेत. केंद्रीय शिक्षण विभागाचे देखील हे मोठे अपयश आहे. नीट पेपर फुटीमुळे शिक्षण विभागाचे लक्तरे वेशीला टांगली गेली आहेत. सर्वसामान्य नागरिकांचा आणि विद्यार्थ्यांचा परीक्षेवरील विश्वासच उडाला आहे. अर्थात नीट सारख्या राष्ट्रीय स्तरावरील परीक्षेचा पेपर फुटण्याची ही पहिलीच वेळ नाही. मागील दहा वर्षात अशा विविध परीक्षांच्या पेपर फुटीच्या शेकडो घटना घडल्या आहेत. यामुळे परीक्षांच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नीट सारख्या वैद्यकीय परीक्षेच्या क्षेत्रात प्रवेश देणाऱ्या परीक्षेच्या तयारीसाठी विद्यार्थी तळमळीने दोन दोन वर्ष अभ्यास करतात. रात्रीचा दिवस करून मेहनत घेतात. त्यांचे एकच स्वप्न असते ते म्हणजे नीट परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होऊन डॉक्टर व्हायचे. मात्र त्यांचे हे स्वप्न ध्वस्त करण्याचे काम कुलकर्णी, मोटेगावकर सारखे लोक करतात. गोरगरीब आणि गुणवंत विद्यार्थ्यांचे स्वप्न हिरावून घेणाऱ्या या गुन्हेगारांना कठोरात कठोर शिक्षा व्हायला हवी. याआधीही असे प्रकार घडले होते तेंव्हाही काही आरोपींना अटक करण्यात आली होती मात्र त्यांच्यावर जरब बसेल अशी कारवाई झाली नाही त्यामुळेच असे घोटाळे पुन्हा पुन्हा घडत आहेत. कोणतेही गुन्हे केले तरी पैशाच्या जोरावर आपण सहिसलामत सुटू शकतो अशी भावना या गुन्हेगारांमध्ये निर्माण झाली आहे त्यामुळेच ते अशाप्रकारचा गुन्हा करुन विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळत आहे. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नीट पेपर फुटी प्रकरणी दिलगिरी व्यक्त केली असली तरी ती पुरेशी नाही केंद्र सरकारने या प्रकरणात दोषी आढळणाऱ्या आरोपींवर मग तो कितीही मोठा आणि पैसेवाला असला तरी त्याच्यावर कठोर कारवाई केलीच पाहिजे. जोवर या लोकांवर जरब बसेल अशी कारवाई होत नाही तोवर या घटना थांबतील असे वाटत नाही. यातील सर्वाधिक आरोपी हे महाराष्ट्राचे असल्याने महाराष्ट्राची मानही शरमेने खाली झुकली आहे. महाराष्ट्रासाठी ही एकप्रकारची नामुष्कीच आहे त्यामुळे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या प्रकरणात गांभीर्याने लक्ष घालणे गरजेचे आहे.

**– श्याम ठाणेदार**

# विद्येच्या माहेरघरीच - विद्येचा 'बाजार'

खरंतर ऐतिहासिक पुणे शहराची ओळख होती ती सांस्कृतिक तसेच विद्येचे माहेरघर,पुणे शहराला जवळपास दोन हजार वर्षांचा इतिहास आहे आणि तसाच लौकिक देखील आहे. पुण्याचे शिक्षण क्षेत्रात मोठेच योगदान आहे. या पुण्यातच देशातील पहिली मुलींची शाळा सावित्रीबाई फुले यांनी १८४८ मधे सुरु केली आणि ती शाळा ज्या ठिकाणी सुरू करण्यात आली तो भिडेवाडा ही पुण्याची ओळख आहे आणि शान देखील आहे. पुण्याचा शैक्षणिक इतिहास जवळपास दोनशे वर्षांचा आहे, जगात ओळख निर्माण केलेल्या अनेक शैक्षणिक संस्था ही पुण्याची देणं आहे. १८२१ साली स्थापन झालेले डेक्कन कॉलेज, १८८० साली स्थापन झालेले न्यू इंग्लिश स्कूल ऑफ फर्ग्युसन कॉलेज,




१९४९ साली स्थापन झालेले पुणे विद्यापीठ, १९२१ साली स्थापन झालेले टिळक महाराष्ट्र विद्यापीठ अशा शैक्षणिक संस्थांमुळेच ऑक्सफर्ड ऑफ द ईस्ट म्हणुनही पुणे ओळखले जाते. मात्र कालानुरूप पुण्याचे रूपडं बदलु लागले, औद्योगिकीकरण त्याच बरोबर मोठ्याप्रमाणावर नागरिकिकरण आणि शहरीकरणामुळे पुणे शहर अमुलाग् बदलले आहे, पुण्यात खाजगी शिकवणी वर्ग, खाजगी शाळा, संस्था मोठ्याप्रमाणावर फोफावत आहे, सरकारी, जिल्हा परिषद, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा बंद पडत असतांना पंचतारांकित शाळांचे पेव फुटले आहे आणि कधीकाळी विद्यादानाचे पवित्र श्वेत्र असलेले शिक्षण क्षेत्र हे पैसा कमावण्याचा धंदा झाला आहे कधीकाळी शिक्षण महर्षींचे पुणे शहर आता शिक्षण सम्राटांचे पुणे म्हणून ओळखले जाऊ लागले आहे. पैसा ही भगवान मानणाऱ्या शिक्षण संस्थाचा धंदा तेजीत आहे. असे असले तरी आजही स्पर्धा परिक्षा, ऊच्च शिक्षणासाठी पुण्याकडे विद्यार्थ्यांचा कल असतो. अनेक शाळा, संस्था या प्रामाणिकपणे शिक्षणाचा दर्जा राखुन आहेत मात्र त्याच बरोबर काही वाईट प्रवृत्ती देखील शिक्षण क्षेत्रात शिरल्या आहे त्यामुळे शिक्षणाचा ऐकुणच बट्ट्याबोळ झाला आहे आणि शिक्षणाचा बाजार मांडला गेला आहे.

काही दिवसांपुर्वी वैद्यकीय पुर्व परिक्षेसाठी घेतल्या जाणाऱ्या 'नीट' स्पर्धेचा पेपर फुटला यामुळे जवळपास बावीस लाख परिक्षार्थिंवर पुन्हा परिक्षा देण्याची वेळ आली आहे, ही परिक्षा घेण्याची जबाबदारी नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) कडे आहे मात्र एनटीए ही गेल्या काही वर्षांपासून परीक्षा सुरळीत पार पाडण्यात नापास होत आहे. विशेष म्हणजे परिक्षा घेण्याची जबाबदारी असलेली एनटीए ने पेपरफुटी ची जबाबदारी घ्यायला मात्र तयार नाही. सीबीआय तपासानंतर काय ते ठरवुन अशी भुमिका एनटीए ची आहे. या पेपर फुटीचे धागेदोरे आता पुण्यापर्यंत पोहचले आहेत आणि याचा मुख्य सुत्रधार पुण्यातील असल्याचे खुलासे तपासात होऊ लागले आहे. पुण्यातील पी. व्ही कुलकर्णी, मनीषा हवालदार, मनिषा मांढरे तीन आरोपीं पुण्यातले आहेत. आतापर्यंत१२ जणांना अटक करण्यात आली आहे. पुण्यातील नामांकित शाळेतील पाच तज्ञांच्या सहभागाची चर्चा होत आहे. तेजस शहा ला पुण्यातुन अटक केली आहे तो पुण्यात भौतिक शास्त्राचा प्राध्यापक एका खासगी संस्थेत कार्यरत आहे आणि तो अनेक प्राध्यापकांच्या संपर्कात होता लातुरच्या दोन डॉक्टरांनी कागदपत्र रद्दीत विकल्याची चर्चा आहे. डॉ. मनोज शिरूर ला या प्रकरणी अटक करण्यात आली आहे. ऐकूणच या सगळ्या मुळे पुण्याच्या लौकिकाला मात्र धक्का लागला आहे.

केवळ शिक्षण क्षेत्राबाबत नव्हे तर एकूणच कायदा व सुव्यवस्था तसेच पुण्यातील ड्रग्ज प्रकरणे, कोयता गँगचा हौदोस, महिला व मुलीवरील अत्याचाराच्या घटनां यामुळे पुणे वारंवार चर्चेत येत आहे. पुण्यातील कारभारी, पहारेकरी, चौकीदार, राजकिय नेते, शासन-प्रशासन यांच्या कार्यपद्धतीवर मोठेच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कधीकाळी विद्येचे माहेरघर असलेल्या पुण्यात विद्येचा असा बाजार मांडला जाणे हे अतिशय दुर्दैवी आहे.

**– अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**९१५८४९५०३७**

## मित्र पक्ष

आपलेचं मित्र पक्ष
करी आपली कोंडी
सर्व पक्षात भरलेले
नेते मंडळी दुतोंडी

प्रसिद्धी झोता येता
मांडीला लावी मांडी
आम्ही सगळे एकत्र
अवास्तवभांडाभाडी

शक्ती प्रदर्शन सारखे
निघायचे घेवून झुंडी
आपले अस्तित्व दावे
उन्हाळ्या वाजो थंडी

यथोचित खाते मिळो
फिरव जादूची कांडी
सन्मानपूर्वक तोडगा
मगप्रेम भरभरु सांडी

अधूनमधूनदोस्तांची
आवळूपहायची मुंडी
विक्राळ रुप दावाया
पुढे करावी रण चंडी

उपोषण न् आंदोलन
सरकारची घसरगुंडी
गायब व्हावे बैठकीत
उडवायची घाबरगुंडी

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# स्वातंत्र्यवीर सावरकरांना 'भारतरत्न' कधी देणार ?

स्वातंत्र्यवीर सावरकरांची इंग्रजी तारखेनुसार जयंती नुकतीच पार पडली. यानिमित्ताने देशभरातील राष्ट्रप्रेमी संस्था, संघटना आणि राजकीय पक्षांच्या वतीने ठिकठिकाणी देशभक्तीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही न डगमगता प्रत्येक श्वासागणिक केवळ राष्ट्राचाच विचार कसा करावा याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे स्वातंत्र्यवीर सावरकर. आज आपण ज्या स्वातंत्र्याची रसाळ फळे चाखत आहोत ते स्वातंत्र्य मिळवण्यासाठी स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या संपूर्ण कुटुंबाने आपल्या घरादारावर तुळशीपत्र ठेवले होते. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी देशभक्त तरुणांना वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनातून चेतना घेऊन स्वातंत्र्याच्या धगधगत्या अग्निकुंडात आहुती देणारे शेकडो तरुण क्रांतिकारक या देशाला मिळाले. त्यांच्या बलिदानातूनच भारतमातेला स्वातंत्र्याचा सूर्योदय पाहता आला. सावरकरांची ग्रंथसंपदा, भाषणे, कविता सारे काही अद्भुत आहे. त्यांच्या साहित्यामध्ये एखाद्या दगडालाही राष्ट्रभक्तीचा पाझर फोडण्याचे प्रखर सामर्थ्य आहे. राष्ट्राप्रती समर्पित अशा विभूतीला मरणोत्तर भारतरत्न देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन २०१९ ची लोकसभा निवडणूक लढवताना भाजपने आपल्या जाहीरनाम्यातून दिले होते. त्यानंतर सात वर्षे उलटली आणि पुढची निवडणूकही भाजपने बहुमताने जिंकली मात्र सावरकरांना भारतरत्न अद्याप जाहीर झालेला नाही. सरकारच्या वतीने नुकतेच पद्म पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. पद्म पुरस्कारासोबत यंदा स्वातंत्र्यवीर सावरकरांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार दिला जाणार असल्याची घोषणा होईल असे वाटले होते; मात्र यंदाही ही आशा फोल ठरली. स्वातंत्र्यानंतर आजपर्यंत ज्या विभूतींना भारतरत्न देण्यात आला आहे त्यांचा विचार करता स्वातंत्र्यवीर सावरकरांना हा बहुमान खूप आधीच मिळायला हवा होता; मात्र दीर्घकाळ सत्ता उपभोगणाऱ्या एका पक्षाला स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या नावाचेच वावडे असल्याने या भीमपराक्रमी राष्ट्रवीराचा पराक्रम गेली काही दशके झाकोळला गेला होता. २०१४ साली झालेल्या सत्ता परिवर्तनानंतर सावरकर खऱ्या अर्थाने वाचले जाऊ लागले, मांडले जाऊ लागले आणि बोलले जाऊ लागले. जेव्हा जेव्हा सावरकरांची जयंती आणि पुण्यतिथी येते तेव्हा तेव्हा स्वातंत्र्यवीरांना अद्याप भारतरत्न का नाही हा प्रश्न ऐरणीवर येतो. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी जे विचार मांडले, भारतीयांना जी शिकवण दिली त्या शिकवणीचे वारसदार म्हणवून घेणारे आज सत्तेवर आहेत. त्यांच्या हाती सर्व काही आहे मग स्वातंत्र्यवीर सावरकरांना या बहुमानपासून अद्याप का दूर ठेवले आहे या प्रश्नाचे उत्तर कोणाकडे मागायचे ?

**– सौ. मोक्षदा घाणेकर,**
**काळाचौकी, मुंबई**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## पाण्यासाठी शेतकऱ्यांचा संताप; जायकवाडी कार्यालयाला ठोकले कुलूप



**अक्षराज : जाफर शेख**

**दि.२९, परभणी :** संपूर्ण राज्यात उन्हाची तीव्रता वाढत असून उकाड्याने नागरिक हैराण झाले आहेत. त्यातच पावसाने अद्याप दमदार हजेरी लावलेली नसल्याने शेतकऱ्यांसमोर पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. नाईकवस परिसरातील शेतकऱ्यांनी कालव्यात तातडीने पाणी सोडण्याच्या मागणीसाठी शुक्रवार, दिनांक २९ मे २०२६ रोजी जायकवाडी पाटबंधारे विभागाच्या कार्यालयाला कुलूप ठोकून आंदोलन केले.या भागातील अनेक शेतकऱ्यांची शेती पूर्णपणे कालव्याच्या पाण्यावर अवलंबून आहे. मात्र मागील काही दिवसांपासून कालव्यात पाणी सोडले जात नसल्याने जनावरे, शेती तसेच पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. शेतकऱ्यांनी अनेक वेळा संबंधित अधिकाऱ्यांकडे मागणी करूनही दखल घेतली जात नसल्याचा आरोप आंदोलकांनी केला.तात्काळ पाणी सोडावे, अन्यथा आंदोलन तीव्र करण्यात येईल, असा इशाराही शेतकऱ्यांनी दिला. कार्यालयासमोर मोठ्या संख्येने शेतकरी जमल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या आंदोलनामुळे प्रशासनाचे लक्ष वेधले गेले असून संबंधित विभागाने लवकर निर्णय घ्यावा, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## धडाकेबाज पोलीस ऑफिसर भास्कर कदम



**अक्षराज : गणेश जाधव**

**दि.२९, नेरूळ (नवी मुंबई) :** धडाकेबाज पोलीस ऑफिसर भास्कर कदम यांची धाडसी कामगिरी २६/११ दहशदवादी हल्ल्यावेळी सर्वांनी अनुभवली २६/११ हल्ल्यावेळी गिरगावं मुंबई या ठिकाणी कसाबला पकडताना शहीद झालेले कर्तव्यदक्ष पोलीस हवालदार तुकाराम ओंबळे आणि त्यांच्या संपूर्ण टिम चे इनचार्ज होते. ते पोलीस ऑफिसर म्हणजे भास्कर कदम या धाडसी कामगिरी बद्दल भास्कर कदम यांना राष्ट्रपती पदक बहाल करण्यात आले होते.

आज याच कामगिरीची पोहच पावती म्हणून भास्कर कदम यांना बढती मिळून ते पिंपरी चिंचवड या ठिकाणी असिस्टेंट कमिशनर ऑफ पोलीस (सहाय्यक पोलीस आयुक्त) म्हणून बढती मिळाले बद्दल दैनिक अक्षराज तर्फे हार्दिक अभिनंदन...

## सातारा जिल्ह्यातील मराठा सेवकांची मनोज जरांगे पाटील यांच्याशी चर्चा



**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२९, पाटण (सातारा) :** कुणबी प्रमाणपत्रासाठी सातारा गॅझेटीअर लागू करण्यासाठी आणि विविध मागण्यांसाठी मराठा योध्दा मनोज जरांगे - पाटील यांचे ३० मे पासून होत असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर या आंदोलनात सहभागी होण्यासाठी सातारा जिल्ह्यातून मराठा समाज पूर्ण ताकदीने उतरणार असल्याचे आश्वासन देत सातारा जिल्ह्यातील तहसील कार्यालय, प्रांत कार्यालय आणि जातपडताळणी कार्यालयातून प्रमाणपत्र देण्यासाठी विलंब लागत असल्याबाबत सातारा जिल्ह्यातील मराठा बांधवांनी मनोज जरांगे-पाटीलांशी अंतरवाली सराटी येथे सविस्तर चर्चा केली. यावेळी सातारा गॅझेटीअर साठी शेवटची लढाई असेल असे मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले. या चर्चेवेळी सातारा गॅझेटिअर आणि कुणबी नोंदींचा मुद्दा समोर आणत सातारा जिल्ह्यात साधारण २.५ ते ३ लाख कुणबी नोंदी सापडल्या आहेत. परंतु, प्रशासकीय उदासीनतेमुळे आतापर्यंत जिल्ह्यात केवळ १५ हजार कुणबी जात प्रमाणपत्रे वाटप करण्यात आली आहेत. राज्यात ५७ लाख कुणबी नोंदी असलेल्या कुटुंबातील नागरिक गेली ५९ वर्षे हक्काच्या आरक्षणापासून वंचित ठेवले जात असल्याचे कटकारस्थान अजूनही केले जात असल्याचे समोर येत आहे. याकडेही प्रामुख्याने यावेळी लक्ष वेधण्यात आले.यावेळी मनोज जरांगे पाटील म्हणाले सातारा गॅझेटीअर साठी सरकारने दिलेला अल्टीमेट कधीच संपलेला आहे. जो पर्यंत आता ही लढाई असेल ती आरपारची असेल. जोपर्यंत अंतीम निर्णय होणार नाही तोपर्यंत मागे हटणार नाही असे त्यांनी सांगितले.

**प्रशासकीय विलंबावर आणि अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी -**

तहसील कार्यालय, प्रांत कार्यालयातून कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी व जात पडताळणी समिती कार्यालयातून जातवैधता प्रमाणपत्र (तरश्रळवळीूं) देण्यास जाणीवपूर्वक विलंब करत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. या संदर्भात प्रतिनिधींनी खालील प्रमुख मागण्या मांडल्या. एकसमान कार्यपद्धत लागू करा: शासनाने पुराव्यांच्या सत्यतेवर आधारित एकसमान कार्यपद्धती विहीत केल्यास नागरिकांना सुलभतेने कुणबी प्रमाणपत्रे मिळतील. तहसील कार्यालय व प्रांत कार्यालयातील जे अधिकारी हेतुपुरस्सर कुणबी प्रमाणपत्र देण्यास विलंब करत आहेत अथवा टाळाटाळ करत आहेत, त्यांच्यावर तातडीने 'बदलाची किंवा शिस्तभंगाची' कारवाई करण्यात यावी. अशी मागणी करण्यात आली.

अंतरवाली सराटी येथे मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या सोबत झालेल्या या बैठकीस सातारा जिल्ह्यातील मराठा सेवक राजेंद्र निकम, माऊली सावंत, विवेक कुराडे-पाटील, सोहम शिर्के, विक्रम सितोळे, किरण भोसले, डॉ. विकास देशमुख, अरुण काकडे, अमोल घाडगे यांच्यासह सातारा जिल्ह्यातील असंख्य मराठा बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पारनेरमध्ये तांत्रिकाकडून महिलेवर लैंगिक अत्याचार

## 'काळुबाईची बाधा' घालवण्याचा बहाणा; साडेसहा लाखांची फसवणूक

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२९, पारनेर (अहिल्यानगर) :** बौद्धिक मतिमंद मुलाचा आजार बरा करण्याचे आणि भावाचे लग्न जमवून देण्याचे आमिष दाखवून एका कुटुंबाची साडेसहा लाख रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार पारनेरमध्ये उघडकीस आला आहे. एवढेच नव्हे तर, मुलाला जिवंत मारण्याची धमकी देऊन भोंदूबाबाने पीडित महिलेवर वारंवार जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी पारनेर पोलीस ठाण्यात भोंदू बाबा, त्याचा मुलगा आणि महिला साथीदाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पारनेर येथील रहिवासी असलेल्या ४० वर्षीय पीडित महिलेचा १७ वर्षांचा मुलगा मतिमंद आहे. वैद्यकीय उपचार करूनही त्याच्यात सुधारणा होत नव्हती, तसेच शेतीत पिके येऊनही घरातील कर्ज फिटत नव्हते. याच दरम्यान पीडितेचा भाऊ याचेही वय होऊनही लग्न जमत नव्हते. कौटुंबिक अडचणींनी खचलेल्या या महिलेला रुई छत्रपती (ता.पारनेर) येथील राजू बन्सी दिवटे, त्याचा मुलगा शशिकांत राजू दिवटे आणि महिला सहकारी शोभा अविनाश तरटे (रा.म्हसणे, पारनेर) हे देवऋषी (देवभगत) असून ते अडचणींवर तोडगा काढतात, अशी माहिती मिळाली होती.

पीडितेने २०२० मधील कोरोना काळापासून या भोंदूबाबाकडे जाण्यास सुरुवात केली. त्यावेळी संशयित भोंदूबाने, तुमच्या कुटुंबाला मांढरदेवीच्या काळुबाईची बाधा आहे, त्यासाठी होमहवन व पूजा करावी लागेल,असे सांगितले. मुलाच्या उपचारासाठी ३ ते ४ लाख आणि भावाच्या लग्नासाठी दीड लाख रुपये खर्च येईल, असे सांगून त्यांनी पीडितेकडून मुलाचे व भावाचे फोटो तंत्र-मंत्र करण्यासाठी मागवून घेतले. सुरुवातीला पूजा साहित्याच्या नावाखाली शोभा तरटे हिने १० हजार रुपये घेतले. त्यानंतर पारनेर येथील मुख्य बाजारपेठेतील चौधरी कॉम्प्लेक्समधील घरात काळुबाईच्या फोटोसमोर होमहवन करून पीडितेला अंगारा व तिर्थ पिण्यास दिले.

जानेवारी २०२५ ते मार्च २०२६ दरम्यान पीडितेने गायत्री कॉम्प्युटर्स, पारनेर यांच्यामार्फत २ लाख ५६ हजार ६८४ रुपये ऑनलाईन आणि एप्रिल २०२६ मध्ये २ लाख रुपये रोख, असे एकूण ४ लाख ५६ हजार रुपयांहून अधिक रक्कम राजू दिवटे याला दिली. तसेच भावाच्या विवाहासाठी एकूण १ लाख ९३ हजार ५३० रुपये ऑनलाईन व रोख स्वरूपात उकळले ही सर्व रक्कम पीडितेने येस बँक फायनान्स कडून कर्ज काढून दिली होती.

पैसे उकळल्यानंतरही मुलाच्या तब्येतीत फरक पडला नाही. यादरम्यान आरोपी राजू दिवटे हा पीडितेला मांढरदेवी येथे पूजेसाठी चारचाकी गाडीतून नेत असताना त्याने गाडीत अश्लील वर्तन केले. त्यानंतर चौधरी कॉम्प्लेक्समधील फ्लॅटवर मुलाच्या उत्तम आरोग्यासाठी माझ्यासोबत शारीरिक संबंध ठेवावे लागतील, नाहीत तुझ्या मुलाच्या फोटोचे तुकडे करून काळुबाईच्या कोपाने त्याला मारून टाकीन अशी धमकी दिली. मुलाच्या जिवाच्या भितीने पीडितेने होकार दिला.

राजू दिवटे याने पीडितेला गुंगीचे किंवा रंगीत पाणी पाजून जानेवारी २०२५ ते १ मार्च २०३६ दरम्यान तब्बल ८ ते २० वेळा जबरदस्तीने अत्याचार केला. काहीही फरक न पडल्याने जेव्हा पीडितेने आणि तिच्या भावाने आपले पैसे परत मागितले, तेव्हा आरोपींनी दोघांनाही शिवीगाळ करत बेदम मारहाण केली. कुठेही तक्रार केली तर समाजात बदनाम करीन, सासरी नांदू देणार नाही, अशी धमकी पिडितेला दिली. भावाला एका रात्रीत तडफडून मारून टाकीन अशी तांत्रिकाने धमकी दिली. भीतीच्या छायेत असलेल्या पीडितेने अखेर आपल्या सासू - सासऱ्यांना हा सर्व प्रकार सांगितला. त्यांनी धीर दिल्यानंतर पीडितेने पारनेर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली.

पोलिसांनी महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा आणि जादूटोणा प्रतिबंधक कायद्यासह बलात्कार, फसवणूक आणि मारहाणीचा गुन्हा दाखल केला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

# कापूरवाडीच्या माळरानावर होणार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय

## २५ एकर जागा निश्चित; महाविद्यालयासाठी ५०० कोटींची तरतूद; खा.लंके यांच्या पाठपुराव्याला मोठे यश

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२९, अहिल्यानगर :** जिल्ह्याच्या वैद्यकीय आणि शैक्षणिक क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालया'साठी नगर तालुक्यातील कापूरवाडी येथे २५ एकर जागा निश्चित करण्यात आली असून, जिल्ह्याच्या पहिल्या सरकारी मेडिकल कॉलेजचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. खासदार नीलेश लंके यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे राज्य शासनाने या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी ५०० कोटी रुपयांची तरतूद केली असून महाविद्यालयासाठी ४४८ पदांची निर्मितीही मंजूर केली आहे.

जिल्ह्यात सरकारी मेडिकल कॉलेज व्हावे. यासाठी खासदार डॉ. निलेश लंके गेल्या दोन वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा करत होते. दिल्ली ते मुंबई विविध स्तरांवर बैठका घेऊन त्यांनी जिल्ह्याची आवश्यकता शासनाच्या निदर्शनास आणून दिली होती. केंद्रीय आरोग्य मंत्री जे.पी. नड्डा यांच्यासमोरही त्यांनी अहिल्यानगर जिल्ह्याची परिस्थिती मांडत मेडिकल कॉलेजची गरज अधोरेखित केली होती. त्यांच्या या सातत्यपूर्ण प्रयत्नांनंतर राज्य शासनाने प्रकल्पाला गती देत आवश्यक प्रशासकीय निर्णय घेतले आहेत.

महाविद्यालयासाठी सुरुवातीला नालेगाव, अरणगाव आणि कापूरवाडी या ठिकाणांची पाहणी करण्यात आली होती. त्यानंतर सर्व निकषांचा विचार करून कापूरवाडी येथील २५ एकर जागा अंतिम करण्यात आली आहे.

या ठिकाणी भविष्यात अत्याधुनिक सुविधा असलेले मेडिकल कॉलेज, संलग्न रुग्णालय, विद्यार्थी वसतिगृह आणि संशोधन सुविधा उभारल्या जाणार आहेत.



**कापूरवाडीचीच जागा का निवडली ?**

कापूरवाडी येथे सुमारे २५० एकर शासकीय जमीन उपलब्ध आहे. यातील बहुतांश जमीन डोंगर उताराची असली, तरी महाविद्यालयासाठी आवश्यक असलेली २५ एकर सपाट जागा निवडून तेथे बांधकाम केले जाईल. यापूर्वी आरणगाव येथील कुष्ठरोग विभागाची जागा न्यायालयीन वादामुळे, तर अमरधाम आणि काटवन खंडोबा दरम्यानची जागा सीना नदीचा पट्टा आणि अपुऱ्या क्षेत्रामुळे बाद करण्यात आली असल्याचे सुत्रांनी सांगितले.

चालू शैक्षणिक वर्षापासून १०० एमबीबीएस जागांसाठी प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार असून सप्टेंबर २०२६ पासून प्रत्यक्ष अध्यापन सुरू होण्याची शक्यता आहे. नवीन इमारतीचे बांधकाम पूर्ण होईपर्यंत महाविद्यालयाचे तात्पुरते कामकाज जिल्हा आयुष रुग्णालयातून चालविण्यात येणार आहे. तसेच पुढील सात वर्षांसाठी जिल्हा शासकीय रुग्णालय (सिव्हिल हॉस्पिटल) मेडिकल कॉलेजकडे वर्ग करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या मेडिकल कॉलेजमुळे जिल्ह्यात तज्ज्ञ डॉक्टरांची उपलब्धता वाढणार असून ग्रामीण भागातील रुग्णांना स्थानिक पातळीवर आधुनिक उपचार सुविधा उपलब्ध होणार आहेत. तसेच वैद्यकीय शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना पुणे, मुंबई किंवा इतर शहरांमध्ये जाण्याची गरज कमी होणार आहे. जिल्ह्याच्या आरोग्य व्यवस्थेला नवी दिशा देणारा हा ऐतिहासिक प्रकल्प ठरणार असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

# महाराष्ट्र सर्फ ओपन २०२६ मध्ये डहाणूच्या आकाश घाटाळची सुवर्ण कामगिरी

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२९, कासा (पालघर) :** मुंबई सर्फ क्लबतर्फे विरार पश्चिम येथील राजोडी बीच येथे आयोजित करण्यात आलेल्या पहिल्या-वहिल्या ऐतिहासिक महाराष्ट्र सर्फ ओपन २०२६ या राज्यस्तरीय सर्फिंग स्पर्धेत डहाणू तालुक्यातील वेती गावच्या कुमार आकाश अनिल घाटाळ याने उल्लेखनीय कामगिरी करत राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. समुद्रातील आव्हानात्मक दर्याशर्यतीत उत्कृष्ट कौशल्य दाखवत त्याने सुवर्णपदक आणि ५ हजार रुपयांचे रोख पारितोषिक आपल्या नावे केले.

डहाणू तालुक्यातील शासकीय आश्रमशाळा तवा येथे इयत्ता दहावीमध्ये शिक्षण घेत असलेल्या आकाश घाटाळने आपल्या जिद्द, मेहनत आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. आदिवासी भागातील विद्यार्थ्याने राज्यस्तरीय स्पर्धेत मिळवलेल्या या यशामुळे संपूर्ण डहाणू तालुक्याचा गौरव वाढला आहे.

या स्पर्धेसाठी आकाशला मुंबई सर्फ क्लबच्या माध्यमातून विशेष प्रशिक्षण देण्यात आले होते. प्रशिक्षक



प्रीती रावत आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आकाशला सर्फिंगचे उत्कृष्ट तांत्रिक प्रशिक्षण दिले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली राजोडी बीचवरील समुद्रातील लाटांवर नियंत्रण ठेवत आकाशने स्पर्धेत प्रभावी कामगिरी केली. कठीण परिस्थितीतही आत्मविश्वास कायम ठेवत त्याने प्रतिस्पर्ध्यांवर मात करून सुवर्णपदक पटकावले.

आकाश घाटाळच्या या ऐतिहासिक यशाबद्दल विविध स्तरांतून त्याचे कौतुक होत आहे. डहाणू आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी विशाल खत्री यांनी आकाशचा सत्कार करून त्याच्या यशाचे अभिनंदन केले. तसेच तवा शासकीय आश्रमशाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, क्रीडा विभागातील अधिकारी आणि प्रशिक्षकांनीही त्याचे विशेष अभिनंदन केले. याशिवाय राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पालघर जिल्हा उपाध्यक्ष अशोक भोईर, विठ्ठल भोईर, इंजिनियर रोहित भोईर आदी मान्यवरांच्या उपस्थितीत आकाशचा गौरव करण्यात आला. यशस्वी भव अशा शुभेच्छा देत उपस्थितांनी त्याच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

आकाशच्या या यशामुळे वेती गावासह संपूर्ण डहाणू तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामीण आणि आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना योग्य प्रशिक्षण, मेहनत आणि चिकाटीच्या बळावर मोठे यश मिळवता येते, हे आकाश घाटाळने आपल्या कामगिरीतून सिद्ध करून दाखवले आहे. दरम्यान, आकाशच्या या यशामागे डहाणू आदिवासी विकास प्रकल्प, शासकीय आश्रमशाळा तवा, मुंबई सर्फ क्लब आणि प्रशिक्षकांचे मोलाचे योगदान असल्याची भावना ग्रामस्थांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

# डिझेल टंचाईमुळे जेसीबी, ट्रॅक्टरच्या मशागतीचे दर वाढले

## यंदाच्या खरीप हंगामावर अनेक समस्यांचे सावट; एकरी ५०० ते ७०० रुपयांनी दर वाढले



यावर्षी जून महिन्यात कर्जमाफीची अंमलबजावणी केली जाईल, अशी घोषणा सरकारने यापूर्वीच केलेली असताना अजून बँकांच्या पातळीवर कोणत्याही हालचाली नाहीत. खरिप हंगाम तोंडावर आलेला असताना अद्याप कर्जमाफी व नव्याने कर्ज वाटप याबाबत कोणतेही धोरण निश्चित झालेले नाही. जर कर्जमाफीची अंमलबजावणी झालीच तर नव्याने कर्ज वाटप कधी केले जाणार असाही प्रश्न शेतकऱ्यांच्या मनात आहे.

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२९, अहिल्यानगर :** शेतातील मशागतीच्या कामातून बैलांची संख्या दिवसेंदिवस घटत गेली आणि आता सर्व मशागत यांत्रिकीकरणावर अवलंबून असल्याने डिझेल दरवाढीचा फटका शेतातल्या कामांना बसला आहे. यंदाच्या हंगामात अचानक ट्रॅक्टरद्वारे होणाऱ्या मशागतीचे दर वाढले आहेत. अनेक मोठ्या शेतकऱ्यांकडे स्वतः चे ट्रॅक्टर असले तरी बहुसंख्य शेतकरी ट्रॅक्टरद्वारे भाड्याने मशागतीची कामे करून घेतात. डिझेलचा प्रचंड प्रमाणात जाणवत असलेला तुटवडा लक्षात घेता शेतातल्या सर्वच कामांचे दर ट्रॅक्टर चालकांनी वाढवले आहेत.

खरीप हंगामात सोयाबीन तसेच इतर पिकांची पेरणी करण्यासाठी एकरी एक हजार रुपये दर होता. तो आता १५०० रुपयांपर्यंत जाऊन पोहोचला आहे. शेतातल्या अन्य कामांचे दरही वाढले आहेत. केवळ ट्रॅक्टरच नव्हे तर जेसीबी चालकांनीही वेगवेगळ्या कामांचे दर वाढवले आहेत. शेतात नव्याने करावयाची पाईपलाईन, शेतातील बांध नीट करणे, झुडपे खोदून काढणे यासारखी कामे जेसीबीद्वारे केली जातात. आता या कामांचेही दर वाढले आहेत. खोदण्यासाठी जेसीबी यंत्राचा एक हजार रुपये प्रति एकर असा होता आता तो १५०० रुपयांपर्यंत गेला आहे. या दरात तब्बल पाचशे रुपयांनी वाढ झाली आहे.

गेल्या वर्षी नांगरणीचे दर १००० रुपये होते. यंदा या कामात जवळपास पाचशे रुपयांची वाढ झाली आहे. नांगरणीनंतर रोटावेटर करण्यासाठी गेल्यावर्षी प्रती एकरी ६०० रुपये भाव होता, आता याच कामासाठी एकरी ९०० रुपये आकारले जात आहेत. ट्रॅक्टरने पाळी करण्यासाठी पूर्वी ८०० रुपये दर आकारला जात असे आता हे दर काही ठिकाणी १२०० रुपयांपर्यंत जाऊन पोहोचले आहेत. शेतातल्या प्रत्येकच मशागतीच्या कामात एकरी ३०० ते ५०० रुपयांची वाढ झाली आहे.

गेल्या काही दिवसात डिझेलचा प्रचंड तुटवडा जाणवत असल्याने शेतातील कामे खोळंबली असताना आता मशागतीचे ही दर वाढल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसू लागला आहे. यंदाच्या खरीप हंगामावर डिझेल तुटवड्याचे मोठे संकट जाणवत आहे.

यंदा पावसाच्या वार्षिक सरासरीत सांगितलेली तूट, रासायनिक खतांचे वाढलेले दर, डिझेलमुळे मशागतीच्या कामांचा झालेला खोळंबा अशा सर्वच पार्श्वभूमीवर खरीप हंगामावर अनेक समस्यांचे सावट दिसून येत आहे.

# बदलत्या परिस्थितीत पौष्टिक तृणधान्यांना अनन्यसाधारण महत्त्व - संशोधन संचालक डॉ.बोडके

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.२९, राहुरी (अहिल्यानगर) :** बदलत्या परिस्थितीत पौष्टिक तृणधान्य हे रोग कीड प्रतिकारक तसेच कमी पाण्यात येणारे आहे. पौस्टिक तृणधान्य आरोग्याच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे असल्याकारणाने या पिकांच्या लागवडीस भरपूर वाव असल्याचे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ.प्रशांत बोडके यांनी केले.

महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विलास खर्चे आणि विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे यांच्या मार्गदर्शनाखाली कृषि विद्यापीठ आणि कृषि विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय कृषि विकास योजनेच्या पौष्टिक तृणधान्य प्रकल्पांतर्गत शिवार फेरी व नाचणी पीक प्रात्यक्षिके या कार्यक्रमाचे आयोजन श्रीगोंदा तालुक्यातील मांडवगण येथील प्रगतीशील शेतकरी सलीम आत्तार यांच्या विद्यापीठ निर्मित फुले कासारी वाणाच्या नाचणी पिकाच्या प्रात्यक्षिक प्लॉटवर करण्यात आले होते. यावेळी डॉ. प्रशांत बोडके मार्गदर्शन करतांना बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर प्रकल्पाचे प्रमुख अन्वेषक आणि कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राचे व्यवस्थापक डॉ.पंडित खर्डे, प्रभारी तालुका कृषि अधिकारी प्रमीला जंजिरे, जिल्ह्याचे महाबीजचे व्यवस्थापक सुनील दौंड, शेतकरी संघटक राहुल पोळ, कोल्हापूर येथील अखिल भारतीय समन्वयित नाचणी व पौष्टिक तृणधान्य संशोधन प्रकल्पाचे प्रमुख डॉ.योगेश बन, डॉ.सुनील अडांगळे, प्रा.अन्सार आत्तार उपस्थित होते.यावेळी डॉ.प्रशांत बोडके मार्गदर्शन करताना पुढे म्हणाले की, नागलीसारख्या पौष्टिक तृणधान्यामध्ये प्रक्रिया करण्यास भरपूर वाव असून यामुळे शेतकऱ्यांना प्रक्रिया द्वारे अधिक अर्थाजन मिळू शकते. संतुलित खत वापर या अभियानांतर्गत त्यांनी जैविक खते तसेच हिरवळीच्या खतांचे महत्त्व विशद केले.

येत्या खरीप हंगामात पिकांचे योग्य नियोजन करून हा हंगाम यशस्वी करण्याचे आवाहन त्यांनी केले. प्रकल्पाचे प्रमुख अन्वेषक डॉ.पंडित खर्डे यांनी प्रास्ताविकात प्रकल्पाची माहिती देऊन त्याची उद्दिष्टे सांगितली. ते



म्हणाले की या प्रकल्पांतर्गत कोल्हापूर, अहिल्यानगर, नाशिक आणि धुळे या जिल्ह्यात पाचशेपेक्षा जास्त पौष्टिक तृणधान्यांची पीक प्रात्यक्षिके या खरीप हंगामात घेण्यात येतील आणि या तंत्रज्ञानाचा प्रचार आणि प्रसार मोठ्या प्रमाणावर करण्यात येईल.

या कार्यक्रमादरम्यान जंजिरे, दौंड तसेच शेतकरी संघटक राहुल पोळ आणि शेतकरी सलीम आत्तार, भाऊसाहेब घाटे, राजेंद्र बिबवे, मेजर परमेश्वर गिलके यांनी नाचणी पीक लागवडीबद्दल आपले अनुभव सांगितले. यावेळी डॉ.योगेश बन यांनी नाचणी व पौष्टिक तृणधान्य पिकांचे महत्व व लागवड तंत्रज्ञान याबद्दल शेतकर्यांना सविस्तर माहिती दिली.

यावेळी मान्यवरांच्या शुभहस्ते संतुलित खत वापर व्यवस्थापन अभियान २०२६ चे भित्तीपत्रकाचे विमोचन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रकल्पाचे सहसमन्वयक डॉ.सुनील अडांगळे यांनी केले. तर डॉ. योगेश बन यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांनी आणि शेतकर्यांनी फुले कासारी नाचणी वाणाच्या पीक प्रात्यक्षिकांना भेटी देऊन पिकाची पाहणी केली. याप्रसंगी श्रीगोंदा तालुक्यातील मांडवगण, बनपिंपरी, नवनाथनगर येथील शेतकरी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कृषि विद्यापीठ, कृषि विभाग तसेच आयोजक शेतकर्यांनी प्रयत्न केले.

# खोणीत रविवारी भाजपचा जाहीर पक्ष प्रवेश; रविंद्र चव्हाण येणार

## विविध पक्षातील पदाधिकारी हाती घेणार कमळ; संजीव नाईक, कथोरे, भोईर यांची उपस्थिती

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२९, कल्याण (ठाणे) :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'राष्ट्र प्रथम' विचाराने प्रेरित होऊन कल्याण ग्रामीणमधील विविध पक्ष व संघटनांमधील शेकडो पदाधिकारी रविवारी भाजपात जाहीर प्रवेश करणार आहेत. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत ३१ मे रोजी सायंकाळी ५.३० वाजता खोणी बस स्टॉप येथे हा भव्य प्रवेश सोहळा होणार आहे. जिल्हाध्यक्ष नंदकिशोर परब यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

**दिग्गज नेते राहणार उपस्थित**

या सोहळ्यास माजी खासदार संजीव नाईक, माजी मंत्री जगन्नाथ पाटील, मुरबाडचे आमदार किसन कथोरे, कल्याण पूर्वच्या आमदार सुलभाताई गायकवाड, कल्याण ग्रामीणचे माजी आमदार सुभाष भोईर, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष अर्चना सुर्यवंशी, जिल्हा उपाध्यक्ष महेश पाटील, लक्ष्मणदादा पाटील, मंडळ अध्यक्ष धनाजी पाटील यांच्यासह कल्याण–डोंबिवलीतील सर्व भाजप नगरसेवक उपस्थित राहणार आहेत.

**काय म्हणाले आयोजक**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विकासनशील दृष्टिकोनावर विश्वास ठेवून हा प्रवेश होत आहे. सर्व नागरिकांनी सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन निमंत्रक तथा कल्याण जिल्हा ओबीसी सरचिटणीस रवि शोरवे यांनी केले आहे.

# कर्नाटक सीमेलगतच्या गावातून महाराष्ट्रात मावा-गुटख्याची खुलेआम तस्करी

**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.२९, सोलापूर :** दक्षिण सोलापूर तालुक्यात कर्नाटक सीमेलगत असलेल्या गावांमधून महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर मावा, गुटखा व सुगंधी तंबाखूची अवैध वाहतूक सुरू असल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. राज्यात बंदी असलेल्या गुटख्याची दिवसाढवळ्या वाहतूक होत असतानाही संबंधित यंत्रणा मात्र संशयास्पद शांत भूमिका घेत असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

स्थानिकांच्या माहितीनुसार, कर्नाटकातून येणाऱ्या चारचाकी वाहनांमधून व खासगी प्रवासी वाहनांतून रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणावर मावा–गुटखा महाराष्ट्रात आणला जात आहे. सीमावर्ती भागातील काही गावांमध्ये हा माल उतरवून पुढे दक्षिण सोलापूरसह इतर भागात पुरवठा केला जात असल्याची चर्चा रंगली आहे.

विशेष म्हणजे, या संपूर्ण प्रकाराला संबंधित बीट अंमलदाराचा आशीर्वाद असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांमधून होत आहे. अवैध धंद्याची माहिती असूनही पोलिसांकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने अर्थपूर्ण दुर्लक्ष केले जात असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वी पोलिसांनी किरकोळ कारवाया करून केवळ दिखावा केल्याची चर्चा असून, मोठ्या मास्यांना मात्र अभय दिले जात असल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे. सीमावर्ती भागात रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या संशयास्पद वाहनांच्या हालचालींमुळे ग्रामस्थ त्रस्त झाले आहेत.

आरोग्यास घातक असलेल्या गुटख्यामुळे तरुण पिढी व्यसनाधीन होत असून, शासनाने बंदी घातल्यानंतरही खुलेआम विक्री सुरू असल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन सीमावर्ती भागातील पोलिसांच्या भूमिकेची चौकशी करावी, अशी मागणी केली आहे. सीमेवरून नेमका कोणाच्या संरक्षणाखाली हा माल येतो? असा सवाल आता नागरिकांमधून उपस्थित केला जात असून, संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

## थोडक्यात

# पेठ येथे जीर्ण विद्युत पोलामुळे विद्युत रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) कोसळले

## सुदैवाने अनर्थ टळला, ग्रामस्थांचा महावितरणावर संताप



**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२९, पालघर :** डहाणू तालुक्यातील पेठ येथील गावपाडा परिसरात वीजपुरवठा करणारी लाईटची डीपी शुक्रवार, दिनांक २९ मे २० २६ रोजी अचानक कोसळल्याची घटना घडली. मुख्य रस्त्यालगत ही डीपी असल्याने मोठा अनर्थ टळला. जीर्ण झालेल्या विद्युत पोलामुळे ही घटना घडल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला असून महावितरणाच्या दुर्लक्षाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

ग्रामीण भागात महावितरणाकडून वीजपुरवठ्यासाठी वापरण्यात येणारे अनेक विद्युत पोल आणि तारा गेल्या अनेक वर्षांपासून बदलण्यात आलेले नाहीत. परिणामी अनेक पोल गंजलेल्या अवस्थेत असून काही ठिकाणी विजवाहिन्यांच्या तारा धोकादायकरीत्या लोंबकळताना दिसत आहेत. तसेच अनेक विद्युत पोल झाडाझुडपांनी वेढलेले असल्याने धोका वाढला आहे.

पेठ येथील मुख्य रस्त्यावरील डीपी ही अनेक वर्षांपासून जुनीच असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे कमी क्षमतेच्या जुन्या डीपीवरच संपूर्ण गावाचा वीजभार टाकण्यात आला आहे. त्यामुळे वारंवार तांत्रिक बिघाड निर्माण होत असल्याचा आरोप स्थानिकांनी केला. याबाबत सामाजिक कार्यकर्ते सुभाष केदार, महेश घरत, यशवंत कोल्हेकर यांच्यासह ग्रामस्थांनी गेल्या २ ते ३ वर्षांपासून नवीन डीपी व नवीन विजवाहिन्या बसविण्याची मागणी करत महावितरण कार्यालय, डहाणू तसेच पालघर येथे वारंवार लेखी पत्रव्यवहार केला होता. मात्र संबंधित अभियंत्यांनी याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. लोकप्रतिनिधींना ही अनेक वेळा निवेदने देऊनही वीज समस्येकडे गांभीर्याने पाहिले गेले नसल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. वेळीच डीपी बदलण्यात आली असती तर ही घटना घडली नसती, अशी प्रतिक्रिया ग्रामस्थांनी व्यक्त केली. दरम्यान, डीपी कोसळल्यामुळे परिसरातील वीजपुरवठा दिवसभर खंडित झाला होता. सायंकाळपर्यंत दुरुस्तीचे काम पूर्ण झाले नसल्याने नागरिकांना अंधाराचा सामना करावा लागला.

**२ महिन्यांपासून विजेचा लपंडाव...**

डहाणू तालुक्यातील पूर्व भागाला चारोटी सब डिव्हिजन मधून वीजपुरवठा केला जातो. मात्र गेल्या २ महिन्यांपासून या परिसरातील अनेक गावांमध्ये सतत वीजपुरवठा खंडित होत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. उकाड्याच्या दिवसांत दिवसा तसेच रात्रीही वारंवार वीज खंडित होत असल्याने नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. एकीकडे नियमित वीज पुरवठा मिळत नसताना दुसरीकडे महावितरणाकडून वेळेवर वीजबिले पोहोचविली जात असल्याने नागरिकांमध्ये रोष निर्माण झाला आहे. वीजबिल वेळेवर भरूनही नागरिकांना अखंडित वीज मिळत नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया ग्रामस्थांनी व्यक्त केली.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त यशवंत सेना प्रतिष्ठानतर्फे भव्य रक्तदान शिबिर

**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.२९, सोलापूर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून अभिवादन करण्याच्या हेतूने यशवंत सेना प्रतिष्ठानतर्फे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष नागेश लवटे यांनी दिली.

हे रक्तदान शिबिर शनिवार, दि. ३० मे २०२६ रोजी सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत एस. टी. स्टँडजवळ, वेलानी पेट्रोल पंपामागे, नरवीर तानाजी नगर येथे आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये युवकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपावी, असे आवाहन प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या कार्यातून समाजसेवा, लोककल्याण आणि मानवतेचा आदर्श निर्माण केला. त्यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेले रक्तदान शिबिर हे समाजासाठी प्रेरणादायी ठरणार असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

रक्तदान हेच श्रेष्ठ दान मानले जाते. एका रक्तदात्यामुळे अनेकांचे प्राण वाचू शकतात. त्यामुळे युवकांनी पुढाकार घेऊन रक्तदान शिबिरात सहभागी व्हावे व खऱ्या अर्थाने अहिल्यादेवींना अभिवादन करावे, असे आवाहन अध्यक्ष नागेश लवटे यांनी केले.

# एफडीए आयुक्त मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली ठाण्यात मोठी कारवाई

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२९, ठाणे :** ठाणे जिल्ह्यातील अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली २७ मे २०२६ रोजी एक मोठी विशेष मोहीम राबवली. या मोहिमेदरम्यान अन्न सुरक्षा व मानके कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या अनेक अन्न व्यावसायिकांवर कडक कारवाई करण्यात आली आहे. एफडीएच्या अधिकाऱ्यांनी विविध अन्न आस्थापनांची तपासणी करून तब्बल ७ लाख ३० हजार रुपयांपेक्षा जास्त किंमतीचा संशयास्पद साठा जप्त केला आहे. यामध्ये १,४९,७२४ रुपयांचे खाद्यतेल, ९३,८३० रुपयांचे फरसाण, २,०६,८०० रुपयांचे तूप, ८,१९० रुपयांचे हक्का नुडल्स, १७,१०० रुपयांची ताडी, ५४,०९६ रुपयांचे शरबत आणि १,९७,६४० रुपये किंमतीच्या डिंकाचा (गम अरेबिक) समावेश आहे. याशिवाय, याच दिवशी प्रतिबंधित अन्न पदार्थांची विक्री केल्याप्रकरणी पोलिसांनी सहा आरोपींवर गुन्हे दाखल करून त्यांना अटक केली असून, त्यांच्याकडून ४,५३,३४४ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

अन्न व औषध प्रशासनाने सर्व अन्न व्यावसायिकांना अन्न सुरक्षेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे आणि स्वच्छता राखण्याचे कडक आवाहन केले आहे. नागरिकांना अन्नपदार्थांच्या दर्जाबाबत काही तक्रार असल्यास त्यांनी प्रशासनाचा टोल फ्री क्रमांक १८००२२२३६५ वर संपर्क साधावा किंवा वागळे इस्टेट, ठाणे येथील सह आयुक्त कार्यालयात लेखी तक्रार करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. सार्वजनिक आरोग्याच्या रक्षणासाठी आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली अशी कडक कारवाई यापुढेही नियमितपणे सुरू राहील, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.